दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/१४/२०१९
दि.२८/०२/२०१९.

**<u>प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.</u>**

श्री.छीतरमल महादेव गुप्ता,
ए-२०५, विनस अपार्टमेंट, नवघर रोड,
भाईंदर (पूर्व), जि.ठाणे ४०११०५. ................अपिलार्थी

जनमाहिती अधिकारी तथा,
आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग ................प्रतिवाद

## -: विवेचन :-

श्री.छीतरमल महादेव गुप्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांचेकडे दि.२३/१२/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) मनपा मिरा भायंदर मे पाच साल से एकही पद पर कौन कौन से अधिकारी/कर्मचारी है, उनकी संपुर्ण जानकारी दे।

२) मनपा मिरा भायंदर मे पाच साल से ज्यादा एक ही विभाग मे कौन कौन से अधिकारी/कर्मचारी है, उनका नाम, पद की संपुर्ण जानकारी दे।

**<u>अपिल दाखल करण्याची कारणे:-</u>**

माहिती अधिकार अंतर्गत माहिती दिली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.१६/०२/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**<u>सुनावणीचा तपशिल:-</u>**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.२८/०२/२०१९ रोजी दुपारी १२.१० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/०२१/२०१९ दि.१८/०२/२०१९ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग हे १४६ ओवळा माजिवडा निवडणूक कार्यालय येथे बैठकीसाठी गेले असल्याकारणाने सुनावणीस अनुपस्थित असुन सहा.जनमाहिती अधिकारी तथा लिपिक व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **<u>अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद</u>**:- माझ्या दि.२३/१२/२०१८ रोजीच्या पत्रानुसार माहिती प्राप्त झालेली नाही.

२) **<u>सहा.जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-</u>** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात येईल.

Scanned by CamScanner

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांनी अपिलार्थी अर्जदारास १५ दिवसांत विनाशुल्क माहिती उपलब्ध करुन द्यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपायुक्त (आस्थापना)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति:-**

१) श्री.छीतरमल महादेव गुप्ता,
ए-२०५, विनस अपार्टमेंट, नवघर रोड,
भाईंदर (पूर्व), जि.ठाणे ४०११०५.

२) जन माहिती अधिकारी तथा — for file
आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग 11/03/2014

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.

Scanned by CamScanner